शुक्रवार दि.२० नोव्हेंबर २००९
दैनिक मराठवाडा साथी

# मुंबई येथे मेगा इंडस्ट्रीयल ट्रेड फेअरचे आयोजन

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)

हॅनोवर मिलानो फेअर्स इंडिया लि.च्या वतीने मुंबई येथे दि.१० ते १३ डिसेंबर दरम्यान मेगा इंडस्ट्रीयल ट्रेड फेअर अर्थातच औद्योगिक व्यापार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत विविध प्रकारची चार प्रमुख प्रदर्शने भरविली जाणार आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञान हे महामेळाव्याचे प्रमुख आकर्षण असेल.

हॅलोवर मिलानो फेअर्स कंपनी पुरस्कृत औद्योगिक व्यापारी महामेळावा बॉम्बे एक्झीबीशन सेंटर, पश्चिम द्रुतगती महामार्ग गोरेगाव पुर्व येथे होत आहे. या अंतर्गत फ्लुईड पॉवर सोसायटी ऑफ इंडियातर्फे ॲटोमेशन की ऑक्स उभारण्यता येणार असुन ॲटोमेशन तंत्रज्ञान, ॲप्लीकेशन ट्रेनिंग बाबतची माहिती तज्ञांद्वारे दिली जाणार आहे. ॲटोमेशन की ऑक्स ही एक नवी संकल्पना असुन जगात कोठेही अद्याप या संकल्पनेचा वापर करण्यात आलेला नाही. या शिवाय मटेरियल्स हँडलिंग ॲण्ड लॉजीस्टीक, इंडस्ट्रीयल ॲटोमेशन सोल्युशन्स फॉर एनर्जी इफिशियन्सी, रीन्युएबल एनर्जी ॲण्ड कॅप्टीव्ह पॉवर प्लाटन्स ही चार प्रदर्शन भरविली जाणार आहेत. लेन्स कंपनीचा ८,४०० फ्रिक्वेन्सीचा नविन इनव्हर्टर, ओमाल कंपनीचे ॲक्च्युएटर्स आणि व्हॉल्वस्, पिटर्स कंपनीचे न्यु मॅटिक हायड्रोलिक, सेन्सर ॲण्ड ॲटोमेशन प्रॉडक्ट आदी नाविन्यपुर्ण उत्पादने हे या प्रदर्शनात मांडले जाती. नवनविन ट्रेंडस्च्या माहितीकरीता हा मेळावा अत्यंत महत्वपूर्ण ठरले यात शंका नाही.